क्र.साप्रवि/रवका/न.क्र.७९४/

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
*मुंबई - ४०० ०१९.*

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. १८७ दिनांक ०३ / ११ /२००८

विषय : भांडार संवर्गातील **'पहारेकरी'** यांना सरासरी वेतनावरील विशेष पूरक रजा मंजूर करणेबाबत.

.....

सा.आ.क्र.१४२ (क) दि.१४.०६.१९९६ अनुसार ज्या कर्मचाऱ्यांचा कामाचा विहित कालावधी ८ तास असून, दुसऱ्या व चौथ्या शनिवारी सुद्धा काम करावे लागते शिवाय जे कर्मचारी कॅलेंडर वर्षामध्ये फक्त ६ दिवस पगारी रजा उपभोगतात अशा विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांना सरासरी वेतनावरील विशेष पूरक रजा मंजूर केली आहे. तथापि, भांडार संवर्गातील **'पहारेकरी',** वरील शर्तीनुसार पात्र असूनही या सवलतीपासून वंचीत राहिल्याने त्यांना सा.आ.क्र.१४२ (क) दि.१४.०६.९६ नुसार सरासरी वेतनावरील विशेष पूरक रजा मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन होता.

२. या संदर्भात सा.आ.क्र.१४२ (क) दि.१४.०६.१९९६ च्या दु.चि.क्र.१ दि.०३.०५.१९९७ व परिपत्रक क्र.साप्रवि/आस्था/ गट-२/२८२३२ दि.२५.०६.१९९८ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार संबंधित विभाग प्रमुखांनी भांडार संवर्गातील **'पहारेकरी'** या वर्गासाठी सरासरी वेतनावरील विशेष पूरक रजा मंजूर करण्यासाठी शिफारस केल्याप्रमाणे संचालक (वित्त) यांनी संचालक (संचलन) आणि कार्यकारी संचालक (मासं) यांच्याशी विचार विनियम करुन खालीलप्रमाणे मंजूरी दिलेली आहे.

३. सा.आ.क्र.१४२ (क) दि.१४.०६.१९९६ च्या दु.चि.क्र.२ दि.०७.११.१९९८ शी संलग्न परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या भांडार विभागामधील प्रवर्गांखाली 'पहारेकरी' हे पद अनु.क्र.४ वर समाविष्ट करण्यात येत आहे.

४. भांडार संवर्गातील **'पहारेकरी'** या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना सरासरी वेतनावरील विशेष पूरक रजा मंजूर करताना खालील अटी ते पूर्ण करतात याची खात्री करावी.

१) कर्मचाऱ्याचा कामाचा विहित करण्यात आलेला कालावधी हा ८ तास असावा.
२) कर्मचाऱ्याने दुसऱ्या व चौथ्या शनिवारी काम करणे आवश्यक आहे.
३) कर्मचाऱ्यास कॅलेंडर वर्षामध्ये फक्त ६ दिवस पगारी रजा अनुज्ञेय आहेत.

५. सा.आ.क्र.१४२ (क) दि.१४.०६.१९९६ मधील इतर सर्व अटी व तरतुदी अबाधित राहतील.

६. वरील आदेश सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित केलेल्या दिनांकापासून अंमलात येतील.

७. सदर प्रशासकीय परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

*( सु.य.पाटील )*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :
विभागीय व त्यावरील स्तराच्या सर्व कार्यालयांपर्यंत महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

*K/Adm.Cir.F.N.794-Average Leave to W'man*
*03/11/2008*